# फलटण तालुक्यात किशोरवयीन मुलींच्या सक्षमीकरणासाठी ‘वर्क फॉर इक्वॅलिटी’चे उल्लेखनीय कार्य

*सुजन न्यूज*



## फलटण तालुक्यात किशोरवयीन मुलींच्या सक्षमीकरणासाठी ‘वर्क फॉर इक्वॅलिटी’चे उल्लेखनीय कार्य

**फलटण तालुक्यात किशोरवयीन मुलींच्या सक्षमीकरणासाठी ‘वर्क फॉर इक्वॅलिटी’चे उल्लेखनीय कार्य**



फलटण प्रतिनिधी : ना-नफा ना-तोटा या तत्त्वावर कार्य करणारी वर्क फॉर इक्वॅलिटी ही सामाजिक संस्था गेल्या १५ वर्षांपासून मुली, महिला व वंचित घटकांच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्यरत आहे. सन २०१० मध्ये संस्थेच्या संस्थापिका सौ. प्रभा विलास यांनी तळेगाव दाभाडे येथे संस्थेची स्थापना केली. खेड, मावळ, तळेगाव परिसरात कार्य केल्यानंतर गेल्या दीड वर्षांपासून संस्था फलटण तालुक्यातही सक्रिय झाली आहे.

जात, लिंगभेद, स्त्री-पुरुष समानता तसेच किशोरवयीन मुला-मुलींचे हक्क या विषयांवर संस्था काम करत असून, किशोरवयीन मुलींमध्ये नेतृत्वगुण विकसित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संस्था करत आहे. अशा प्रकारचे कार्य करणारी ही महाराष्ट्रातील एकमेव संस्था असल्याचे सांगण्यात येते.

फलटण तालुक्यात कमिन्स इंडिया फाउंडेशन यांच्या सहकार्याने १९ गावांमध्ये किशोरवयीन मुलींसाठी २२ गर्ल्स क्लब स्थापन करण्यात आले असून, त्यापैकी ६ क्लबचे उद्घाटन करण्यात आले आहे. या क्लबच्या माध्यमातून मुलींना गावातच व्यक्त होण्यासाठी स्वतंत्र व्यासपीठ मिळाले आहे. या उपक्रमांतर्गत १६ किशोरी सखी व ८८ ग्रुप लीडर्सची नियुक्ती करण्यात आली आहे.

या गटांमुळे मुलींमध्ये संघटन, आत्मविश्वास, संवादकौशल्य व नेतृत्वगुण विकसित होत असून स्वतःच्या हक्कांविषयी बोलण्याचे धाडस त्यांच्यात निर्माण झाले आहे. एका गावात मुलींनी पुढाकार घेऊन शाळेतील अस्वच्छ शौचालयांचा प्रश्न उपस्थित केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे शाळेतील सर्व

मुलींना आता स्वच्छ शौचालयांचा वापर करता येत आहे. तसेच काही गावांमध्ये शाळेसाठी वेळेवर एस.टी. बस उपलब्ध नसल्याच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी मुलींनी काम सुरू केले आहे.

संस्थेमार्फत १९ शाळांमध्ये कार्य केले जात असून आतापर्यंत १७०० विद्यार्थ्यांना लिंगभेदाबाबत तर २००० विद्यार्थ्यांना ॲनिमियाविषयी प्रशिक्षण देण्यात आले आहे. शाळा व गावातील गटांना वाचनपुस्तके व खेळाचे साहित्यही देण्यात आले आहे. १४ नोव्हेंबर रोजी १० शाळांमध्ये बालविवाह विषयावर आधारित चित्रपट दाखवून बालदिन साजरा करण्यात आला. काही शाळांमध्ये संविधान दिनही साजरा करण्यात आला.

पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने पर्यावरणपूरक गणेशोत्सव, पथनाट्य व रॅली तसेच फटाके विरहित दिवाळी साजरी करण्यासाठी पालकांमध्ये जनजागृती करण्यात आली. बदलत्या काळात पालक व मुलींमधील नातेसंबंधांवर मार्गदर्शन करण्यासाठी तरडगाव येथे ७ गावांतील ६५ पालकांसाठी मानसशास्त्रज्ञ समीक्षा ताई यांच्या उपस्थितीत सभा घेण्यात आल्या.

३० नोव्हेंबर  रोजी तरडगाव येथे सर्व लीडर्ससाठी क्लस्टर मिटिंग घेण्यात आली. या बैठकीस ७१ लीडर्स व १२ किशोरी सखी उपस्थित होत्या. या माध्यमातून मुलींना त्यांच्या हक्क व जबाबदाऱ्यांची माहिती देण्यात आली.

या सर्व उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीत संस्थेच्या संस्थापिका सौ. प्रभा विलास, प्रोग्राम डायरेक्टर मनोज सर, प्रोजेक्ट को-ऑर्डिनेटर राजश्री रासकर, फील्ड ऑफिसर्स उर्मिला चव्हाण, सोनल मोरे, रेखा जगताप, तसेच सर्व किशोरी सखी व किशोरवयीन मुलींचे योगदान मोलाचे ठरले आहे.